# विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी 'मेटामॉफॉसिस' उपक्रम : डॉ. हांडे

**दोडामार्ग : वार्ताहर**

शिक्षण परिपूर्ण होण्यासाठी विद्यापीठ व महाविद्यालये कार्यरत आहेत. या प्रक्रियेत काही विद्यार्थी न्यूनगंडामुळे आत्मविश्वास गमावून बसतात. तेसुरवंटातूनबाहेरपडतनाहीत. या सुरवंट्याचे फुलपाखरामध्ये रुपांतर व्हावे म्हणून विद्यापीठाने गेल्या चार वर्षापासून 'मेटामॉफॉसिस' हा प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पाद्वारे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण बाहेर काढावे व त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करावा, जेणेकरून त्यांचा स्वाभिमान जागा होण्याबरोबरच व्यक्तिमत्त्व विकासही होईल. अशा युवकांचा समाज परिवर्तनासाठी उपयोग होईल, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठाच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक प्राचार्य डॉ. राजपाल हांडे यांनी केले.

मुंबई विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ व लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात आयोजित 'मेटामॉफॉसिस' या नाविन्यपूर्ण प्रकल्पाच्या कोकणमधील पहिल्या एक दिवशीय शिबिराचे उद्घाटन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील होते. प्रकल्पाचे समन्वयक डॉ. प्रदीप कामठेकर, प्रा. डॉ. विनायक दळवी, कॅप्टन श्रीमती नीलिमा प्रभू आदी उपस्थित होते.

डॉ. हांडे यांनी 'मेटामॉफॉसिस' अर्थात सुरवंटाचे फुलपाखरू या उपक्रमाचे उद्देश स्पष्ट केले. ते म्हणाले, विद्यापीठाच्या योजना सर्वदूर पसरलेल्या ग्रामीण व दुर्गम भागातील महाविद्यालयापर्यंत पोहोचण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असून त्यापैकी 'मेटामॉफॉसिस' हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. 'मेटामॉफॉसिस' म्हणजे परावर्तित होणे होय. या शिबिरातून मिळणाऱ्या ज्ञानाचा दैनंदिन वैयक्तिक जीवनामध्ये वापर करून नवनवीन ज्ञान समाजापर्यंत पोहोचण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

दोडामार्गसारख्या दुर्गम आणि डोंगराळ भागात शिक्षणाची ज्ञानगंगा तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी या हेतूने प्रेरित होऊन पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते आ. कपिल पाटील व अभिजीत हेगशेटये यांनी नवनिर्माण शिक्षण संस्थेचे महाविद्यालय २००१ मध्ये सुरू केले. तेव्हापासून आजतागायत महाविद्यालयाची वाटचाल यशस्वीपणे सुरू असल्याचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी सांगितले. कोणत्याही उपक्रमात भाग घेणाऱ्या मुलांना फुलपाखरू बनविण्यासाठी 'मेटामॉफॉसिस' महोत्सव हा दुर्गम व ग्रामीण भागातील मुलांपर्यंत पोहोचला पाहिजे असे त्यांनी सांगितले.

मुलाखत तंत्र व संभाषण कौशल्य या विषयावर प्रा. डॉ. विनायक दळवी यांनी मार्गदर्शन केले. कॅप्टन श्रीमती नीलिमा प्रभू यांनी एनसीसी, एनएसएसची ध्येय, उद्दिष्टे व वैशिष्ट्यांबद्दल तर डॉ. प्रदीप कामतेकर यांनी 'मेटामॉफॉसिस' बद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी तसेच दीपक केसरकर विज्ञान महाविद्यालय दोडामार्गचे विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. पी. डी. गाथाडे यांनी तर आभार प्रा. एस. एन. जाधव यांनी मानले.